DIRECTORATE OF INDUSTRIES
उद्योगसंचालनालय
GENERALMANAGER, DISTRICT INDUSTRIES CENTRE
कार्यालय, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद

जा.क्र.जिउकेऔ/जिनिप्रस/इतिवृत्त/२०२०/ दिनांक

**बैठक**

**विषय :- मा.श्री. सुनील चव्हाण, भाप्रसे, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे** अध्यक्षतेखाली **जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा निर्यात प्रचालन** समितीच्या **दि.२३.१२.२०२० रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्तांत.**

| | |
|---|---|
| **उपस्थित अधिकारी/कर्मचारी** | **सोबत जोडलेल्या हजेरीपटाप्रमाणे सर्व अधिकारी उपस्थित होते.** |

सदर बैठकीमध्ये मा. जिल्हाधिकारी महोदयांकडून खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले.

| अ. क्र. | विषय | मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सुचना | कार्यवाही करणारा विभाग | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा निर्यात प्रचालन समितीची माहिती सादर करणे. | • सर्वप्रथम सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेला सुरुवात केली. महाराष्ट्र शासन, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि.१९.१०.२०२० अन्वये महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद व जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबतचा आदेश निर्गमित केला आहे. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्यात आलेली असून समितीचे कार्याबाबतची माहिती सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी खालीलप्रमाणे दिली.<br>१. वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार व राज्य शासन यांच्यामध्ये समन्वय साधून जिल्हयांना निर्यात केंद्र बनविण्यासाठी प्रयत्न करणे.<br>२. जिल्हयांना निर्यात केंद्र म्हणून | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद. | |

हॉलीडेकॅम्प समोर, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद, पिन- ४३१००१, फोन (०२४०) २३३११३६
फॅक्स (०२४०) २३३०६६५ / २३३११३६
E-Mail : didic.aurangabad@maharashtra.gov.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विकसित करुन निर्यात वृध्दीसाठी प्रयत्न करणे.<br>३. निर्यातीसाठी नवीन क्षेत्राची निवड करणे.<br>४. जिल्हयामधील पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठीचे अडथळे ओळखून निर्यातीसाठी पुरक धोरण राबविणे. | | |
| २. | जिल्हा निर्यातचा आराखडा तयार करण्याकरिता मुद्दे निहाय चर्चा करणे व माहिती सादर करणे. | • सभेमध्ये खालील मुद्यावर चर्चा करण्यात आली.<br>1. हस्तव्यवसायामधील उत्पादनांचे निर्यातीकरिता Catalogue तयार करणे.<br>२. जिल्हा निर्यात ॲक्शन प्लान तयार करणे.<br>३. DGFT चा सहकार्याने Export Market Database तयार करणे.<br>४. मुलभूत सुविधांच्या कमतरताविषयी माहिती घेणे.<br>५. कायमस्वरुपी प्रशिक्षण संस्था B२B/ Workshop/ Seminar जिल्हयातील विविध भागात माहितीकरिता आयोजित करणे.<br>६. जिल्हयाचा Export Action Plan सुधारित व अद्यावत करणे.<br>७. निर्यातीकरिता क्लस्टर चा सहभाग घेणेबाबत अंमलबजावणी करणे.<br>८. निर्यातविषयक तक्रारनिवारण जिल्हास्तरावर करणे अन्यथा मैत्रीकक्षाकडे पाठविणे.<br>९. स्थानिक उपलब्ध कच्चा मालातून उत्पादन केलेल्या वस्तूंना निर्यातक्षम करणे.<br>१०. जिल्हा निर्यात प्रचालन समिती कडून सुचविलेले इतर बाबी.<br>११. District Action Plan व Task Force Committee च्या सुचना | श्री. दिपक झालानी, सहाय्यक महासंचालक, विदेश व्यापार महानिदेशालय, मुंबई | १५ दिवस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या सभेत ठेवून अंतिम करणे.<br>१२. एक जिल्हा- एक उत्पादन क्षेत्रामध्ये तसेच हस्तव्यवसायामध्ये जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या सभेच्या मान्यतेने मान्य करणे.<br>१३.जिल्हास्तरावर निर्यात वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. | | |
| ३. | जिल्हयात होत असलेल्या निर्यातीची माहिती संकलित करणे. | • जिल्हयातून प्रत्यक्ष निर्यातीबाबतची माहिती जिल्हा वस्तू व सेवाकर कार्यालय आणि विदेश व्यापार महानिदेशालय, मुंबई यांनी उपलब्ध करुन द्यावी, असे मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी निर्देश दिले. | विदेश व्यापार महानिदेशालय, मुंबई व जिल्हा वस्तू व सेवाकर कार्यालय, औरंगाबाद | १५ दिवस |
| ४. | जिल्हयात निर्यात वाढीबाबत आराखडा तयार करणे व मुलभूत सुविधाबाबत माहिती सादर करणे. | • जिल्हयातून निर्यातवाढ होण्याच्या दृष्टीने उत्पादनाची निवड करणे.<br>३. जिल्हयातून निर्यातवाढ होण्याच्या दृष्टीने मुलभूत सुविधा आणि Logistic बाबत काय करणे आवश्यक आहे, याबाबत माहिती घेणे.<br>४. शासनाच्या योजनांमधून जिल्हयात निर्यात वाढीकरिता MSME ला अंतर्भूत करण्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>५. विदेश व्यापार महानिदेशालय, मुंबई यांनी सुचविलेल्या उत्पादनांव्यतिरिक्त Engineering Ancillary World Wide Products, Automobiles Assembly, फर्निचर अँड किचन, सीड्स, स्टिल व प्लास्टीक इ. उत्पादनांचा समावेश करण्याबाबत सदस्यांनी सुचविले.<br>• मा. अध्यक्षांनी जिल्हयातील निर्यात वाढविण्याकरिता सर्व औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी व निर्यातदार प्रतिनिधी यांना आवाहन केले की, | जिल्हयातील औद्योगिक संघटना व प्रमुख निर्यातदार प्रतिनिधी | १५ दिवस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | जिल्हयात निर्यात वाढीबाबत आवश्यक उपाययोजना करणे. | जिल्हयात निर्यात वृध्दी होण्याचे दृष्टीने काय काय सुविधांची आवश्यकता आहे जसे की, त्यामध्ये Logistic and Infrastructure, प्रशासकीय बाबी, धोरणात्मक बाबीबाबत समावेशन तसेच Marketing Support इ. बाबत अहवाल पुढील सभेत सादर करणेबाबत निर्देश दिले.<br>• त्यावर औद्योगिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, केंद्र शासनाच्या निर्यात प्रचालनाच्या योजना ह्या सिमित असल्याने राज्य शासनामार्फत काही योजना देता येईल का याबाबत निर्णय व्हावा.<br>• तसेच, मा. अध्यक्षांनी सर्व औद्योगिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हयात निर्यात वाढीबाबत आवश्यक असलेल्या उपाययोजनाबाबतची माहिती पुढील सभेत सादर करण्याबाबत निर्देश दिले. | जिल्हयातील औद्योगिक संघटना व प्रमुख निर्यातदार प्रतिनिधी | १५ दिवस |

सचिव तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी उपस्थित असलेल्या सर्व उपस्थितांचे आभार मानले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपन्न झाली असे जाहीर केले.

(के.जी. डेकाटे)
सचिव जिल्हा निर्यात प्रचालन समिती
तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
औरंगाबाद.

(सुनील चव्हाण भाप्रसे)
अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती तथा
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
औरंगाबाद.